Lokmat : Date : 23/03/2010

# प्रिसीजनकडून कॉलरा प्रतिबंधक औषधांचे मोफत वाटप

**सोलापूर, दि. २२ (प्रतिनिधी)** – गेल्या १५ दिवसांपासून सोलापुरात दूषित पाणीपुरवठ्यामुळे कॉलऱ्याची साथीमुळे १३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. यावर येथील प्रिसीजन कॅमशाफ्टस् उद्योगाने उपयायोजना म्हणून अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहत कामगार वस्तीमध्ये कुटुंबियांना कॉलरा प्रतिबंधक औषधांचे मोफत वाटप केले. शिवाय कॉलरा न होण्यासाठी घरोघरी जाऊन पाणी उकळून प्यावे, पाण्याच्या भांड्याची स्वच्छता राखणे तसेच घर, परिसर व वैयक्तिक स्वच्छता राखण्याचे आवाहन केले.

प्रिसीजन फाऊंडेशनच्या वतीने आशा नगर, नीलम नगर, गरिबी हटाव झोपडपट्टी, गवळी वस्ती, इंदिरा नगर, कुमठा नाका, माळी नगर, मल्लिकार्जुन नगर, माधव नगर, कल्याण नगर, नई जिंदगी या परिसरात कामगारांच्या घरोघरी जाऊन कॉलरा प्रतिबंधक औषधांचा पुरवठा केला. कॉलराग्रस्त भागातील १२ कामगार वसाहतीमध्ये ७६ कुटुंबियांची तपासणी करण्यात आली. यांना कॉलऱ्यापासून काळजी घेण्याविषयी आवाहन केले.

यामध्ये प्रिसीजनचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एस.एस. जयदीप, संजीव माळवदकर, एस.एच.थिटे, एस.बी. चंदनशिवे, दीप्ती गुमास्ते आदींचा सहभाग होता.



प्रिसीजन कॅमशाफ्टस्तर्फे शहरातील कॉलराग्रस्त भागात प्रतिबंधक औषधांचे वाटप करताना वैद्यकीय अधिकारी डॉ. एस.एस. जयदीप, संजीव माळवदकर, एस.एच.थिटे, एस.बी. चंदनशिवे, दीप्ती गुमास्ते.

Punya Nagari : Date : 23/03/2010

# कॉलराग्रस्तांची 'प्रिसीजन'कडून तपासणी



सोलापूर, दि. २२ (प्रतिनिधी) - शहरातील दूषित पाणी पुरवठ्यामुळे कॉलऱ्याच्या साथीने आता आक्राळ विक्राळ रूप धारण करायला सुरुवात केली आहे. या साथीच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी प्रिसीजन कॅमशाफ्टस् लिमिटेड उद्योगाने अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. भागातील कामगार वस्त्यांमध्ये जाऊन कामगार कुटुंबीयांना कॉलराप्रतिबंधक औषधांचा मोफत पुरवठा केला. तसेच पाणी उकळून पिणे, पाण्याच्या भांड्यांची स्वच्छता राखणे, घर व परिसराची स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता याविषयी जनप्रबोधन करण्यात आले.

प्रिसीजन फौंडेशनच्या वतीने अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. भागातील आशा नगर, नीलम नगर, गरिबी हटाव झोपडपट्टी, गवळी वस्ती, इंदिरा नगर, कुमठा नाका, माळीनगर, मल्लिकार्जुन नगर, माधव नगर, कल्याण नगर, नई जिंदगी आदी परिसरात घरोघरी जाऊन कॉलराग्रस्त रुग्णांची तपासणी करून प्रतिबंधक औषधांचा पुरवठा केला. या मोहिमेत प्रिसीजनचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एस.एस. जयदीप, परिचारिका, मनुष्यबळ विभागाचे सहव्यवस्थापक संजीव माळवदकर, एस.एच. थिटे, एस.बी. चंदनशिवे, दीप्ती गुमास्ते आदींनी सहभाग नोंदविला.

Sakal : Date : 23/03/2010

# कॉलराग्रस्त भागात प्रिसिजनची मदत

## बाधित वसाहतीत औषधांचे वाटप

सोलापूर, ता. २२ : येथील प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेडच्या वतीने कॉलराग्रस्त भागात प्रतिबंधक औषधांचे वाटप करण्यात आले.

अक्कलकोट रस्त्यावरील औद्योगिक वसाहतीमध्ये प्रिसिजन फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी पाहणी करून औषध पुरवठा केला. वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. एस. जयदीप, व्यवस्थापक संजीव माळवदकर, एस. एच. थिटे, एस. बी. चंदनशिवे, दीप्ती गुमास्ते यांच्या चमूने आशानगर, श्रमजीवी नीलमनगर, गरिबी हटाव झोपडपट्टी, गवळी वस्ती, इंदिरानगर, कुमठा नाका, माळीनगर, मल्लिकार्जुननगर, माधवनगर, कल्याणनगर, नई जिंदगी आदी परिसरात कामगारांच्या घरोघरी जाऊन पाहणी करण्यात आली. ७६ कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांनी औषधांचा लाभ घेतला.



सोलापूर : प्रिसिजन फाउंडेशनच्या वतीने कॉलराग्रस्त भागात मोफत औषधांचा पुरवठा करण्यात आला.

Sanchar : Date : 23/03/2010

# कॉलरा नियंत्रणासाठी 'प्रिसीजन'ची मोहीम

**सोलापूर, दि. २२- दूषित पाणीपुरवठ्यामुळे कॉलरा पसरत असून यावर नियंत्रण आणण्यासाठी प्रिसीजन कॅमशाफ्टस् लिमिटेड उद्योगाने आपला खारीचा वाटा उचलला आहे.**

अक्कलकोट रोड एम. आय. डी. सी. भागातील कामगार वस्त्यांमध्ये जाऊन कामगार कुटुंबियांना कॉलरा प्रतिबंधक औषधांचा मोफत पुरवठा करण्यात आला. घरोघरी जाऊन पिण्याचे पाणी उकळून पिणे, पाण्याच्या भांड्यांची स्वच्छता राखणे, तसेच घर व परिसराची स्वच्छता, वैयक्तिक स्वच्छता याविषयी माहिती देऊन जागरुकता निर्माण केली. अक्कलकोट रोड एम. आय. डी. सी. भागातील आशा नगर, निलम नगर, गरिबी हटाव झोपडपट्टी, गवळी वस्ती, इंदिरा नगर, कुमठा नाका, माळी नगर, मल्लिकार्जुन नगर, माधव नगर, कल्याण नगर, नई जिंदगी आदी परिसरात कामगारांच्या घरोघरी जाऊन कॉलराग्रस्त रुग्णांची तपासणी करून प्रतिबंधक औषधांचा पुरवठा केला. प्रिसीजनचे वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. एस. जयदीप, परिचारिका, मनुष्यबळ विभागाचे सह व्यवस्थापक संजीव माळवदकर आदींच्या चमूने ही आरोग्य तपासणी मोहीम हाती घेतली. या मोहिमेअंतर्गत जवळपास १२ विविध वस्त्यांमध्ये जाऊन केलेल्या सर्वेक्षणात उलट्या, जुलाब होत असल्याच्या तक्रारी असतील त्या कुटुंबीयांची तपासणी केली. आतापर्यंत ७६ कामगार कुटुंबिय व त्यांच्या कुटुंबियांची तपासणी करून औषधांचा पुरवठा केला.

Sanchar : Date : 23/03/2010

# प्रिसीजन कॅम्पशाफ्टमध्ये सुरक्षा सप्ताह साजरा

**सोलापूर, दि. २२ (शहर संचार)- औद्योगिक सुरक्षा सप्ताह प्रिसीजन कॅम्पशाफ्टच्या तिन्ही प्लान्टवर मोठ्या उत्साहात साजरा केला गेला.**

या औद्योगिक सुरक्षा सप्ताहाच्यानिमित्ताने विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात सुरक्षा घोषवाक्य स्पर्धा, सुरक्षा कविता, सुरक्षा पोस्टर व सुरक्षाविषयक प्रश्नमंजूषा यासारख्या कार्यक्रमांचा समावेश होता. या सर्व स्पर्धामध्ये प्रिसीजनच्या कामगार व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

सप्ताहाच्या प्रारंभी प्रिसीजनचे सुरक्षा अधिकारी सुहास पाटील यांनी चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील निर्यातभिमुख युनिटस्मध्ये औद्योगिक सुरक्षेची शपथ दिली. आग प्रतिबंधक उपाययोजनाचे प्रात्यक्षिक देण्यात आले. यात आग लागण्याची कारणे, आगीचे प्रकार व आगीच्या प्रकारानुसार आग रोखण्याचे उपाय याचीही माहिती देण्यात आली. अक्कलकोट रोडवरील युनिटमध्ये संजीव माळवदकर यांनी सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगितले. तसेच सर्व कामगारांना सुरक्षेची शपथ दिली. हा संपूर्ण सुरक्षा सप्ताह यशस्वी करण्यासाठी सहव्यवस्थापक संजीव माळवदकर, सुरक्षा अधिकारी सुहास पाटील, एस. बी. चंदनशिवे, दीप्ती गुमास्ते, सचिन थिटे, दीपक राजपूत, आंबण्णा नादरगी, अकील हवालदार आदींनी परिश्रम घेतले. त्यांना मनुष्यबळ विभागाचे सहाय्यक सरव्यवस्थापक आर. के. काशीद यांचे मार्गदर्शन लाभले.